दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २९१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०२ जून २०२५


**सुंदर सुविचार**

आपल्याला हवी असणारी गोष्ट मिळविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तीव्र इच्छाशक्ती.

## थोडक्यात

### कल्याण रेल्वे स्टेशनवरून मारवाडसाठी निघालेले वृद्ध बेपत्ता !



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०१, कल्याण :** कल्याण रेल्वे स्टेशनवरून एक वृद्ध व्यक्ती बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील सिवास गावचे रहिवासी ५८ वर्षीय कालूराम दीपारामजी चौधरी हे २९ मेच्या रात्री हडपसर-जोधपूर सुपरफास्ट एक्स्प्रेसने मारवाड जंक्शनसाठी घरातून निघाले होते. मात्र ते ना ठरलेल्या गंतव्यस्थळी पोहोचले आणि ना बदलापूरमधील आपल्या घरी परतले. कालूराम चौधरी यांचे पुत्र सुरेश चौधरी यांनी सांगितले की, त्यांनी स्वतः आपल्या वडिलांना कल्याण रेल्वे स्टेशनवर ट्रेनमध्ये बसवण्यासाठी आणले होते. मात्र, स्टेशनवर खूप गर्दी असल्याने ते प्लेटफॉर्म क्रमांक ७ वर वडिलांपासून वेगळे झाले आणि त्यानंतर कालूराम यांचा काहीही थांगपत्ता लागलेला नाही.

परिवार अत्यंत चिंतेत असून मुंबईसह आसपासच्या सर्व रेल्वे स्थानकांवर शोध घेतला गेला आहे. मात्र अद्याप कुठलाही ठोस सुराग मिळालेला नाही. दरम्यान, कल्याण लोहमार्ग पोलीस स्टेशनने सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून बेपत्ता वृद्धाचा शोध घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.

**कोणालाही या वृद्धाबद्दल माहिती असल्यास कृपया नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. अन्यथा पुढील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा मोबा.९९८७४९१६८५**

### पहलगाम दहशतवादी हल्लयातील राज्यातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाखांची मदत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, ठाणे :** जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयात महाराष्ट्रातील सहा नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या हल्लयात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाखांची आर्थिक मदत वितरित करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयात मृत झालेल्या राज्यातील नागरिकांच्या कुटुंबियांना सुरवातीस ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, नंतर झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही मदत रक्कम वाढवून प्रत्येकी ५० लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार मदत व पुनर्वसन विभागाने मृतांच्या कुटुंबियांना ही आर्थिक मदत वितरित केली.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे पीडित कुटुंबियांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारकडून मिळालेली ही मदत अशा कठीण काळात कुटुंबीयांना थोडा आधार देणारी आहे, अशी भावनाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केली.

### अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा दौरा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नांदेड :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ हे २ जून रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. रविवार, ०१ जून २०२५ रोजी नाशिक येथून रात्री ७.५५ वा. नंदीग्राम एक्सप्रेसने सहस्त्रकुंड जि. नांदेडकडे प्रयाण. सोमवार, दिनांक ०२ जून २०२५ रोजी सकाळी ७ वा. सहस्त्रकुंड जि.नांदेड रेल्वे स्टेशन येथे आगमन व इस्लामपुर शासकीय विशामगृह कडे प्रयाण व राखीव. सकाळी ८ वा. शासकीय विशामगृह इस्लामपूर येथून सहस्त्रकुंड धबधबा कडे प्रयाण. सकाळी ८.३० वा. सहस्त्रकुंड धबधबा नांदेड येथे शेतकरी बांधवासोबत भेट व चर्चा. सकाळी १० वा. श्रीमती भाग्यरथाबाई शेषराव मिराशे यांची कन्या चिसौका. सोनु यांचे विवाहास उपस्थिती.

स्थळ- थारा ता. किनवट जि. नांदेड सकाळी ११ वा. थारा जि. नांदेड, किनवट येथून हुडी कडे प्रयाण. सकाळी ११.३० वा. निर्गुण कदम यांचे फार्महाऊस येथे आगमन व राखीव. दुपारी ३.३० वा. हुडी ता. किनवट येथून नांदेडकडे प्रयाण. दुपारी ३.३० वा. गुरुगोविंदसिंग गुरुद्वारा नांदेड येथे आगमन व दर्शन. दुपारी ४ वा. शासकीय विशामगृह नांदेड येथे आगमन व लोकप्रतिनिधी व विविध संघटनासमवेत चर्चा. सायं. ६ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून रेल्वे स्टेशन कडे प्रयाण. सायं. ६.४५ वा. नांदेड येथून देवगिरी एक्सप्रेसने मुंबईकडे प्रयाण करतील.

## हवामान विभागाचं २० राज्यांना हाय अलर्ट;महाराष्ट्राची चिंता वाढणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** देशात वेळेपूर्वीच मान्सूनचं आगमन झालं आहे. हवामान विभागाने देशातील २० राज्यांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. यादरम्यान या भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. **२० राज्यांना पावसाचा हाय अलर्ट**

देशातील अनेक भागात मान्सूनचं आगमन झालं आहे. भारतीय हवामान विभागाने (खचू) पुढील तीन दिवस म्हणजे १ जून ते ३ जून या कालावधीत ईशान्य, वायव्य, दक्षिण आणि मध्य भारतातील सुमारे २० राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, वादळ आणि ७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा इशारा दिला आहे. या काळात, वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



**महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता, विदर्भालाही अलर्ट**

महाराष्ट्रात मान्सून हा निश्चित वेळेच्या १२ दिवसांपूर्वीच दाखल झाला. तर त्यापूर्वी राज्यात मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने हाहा:कार माजवला होता. मान्सूनचं आगमन झाल्यापासून राज्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रालाही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर, विदर्भात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोरमलाही पावसाचा अलर्ट**

१ जूनपासून आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरामध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. यादरम्यान अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमम ध्येही मुसळधार पाऊस पडेल.

**दिल्ली, हरियाणामध्ये सोसाट्याचे वारे वाहणार**

पुढील तीन दिवस दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि राजस्थानमध्ये वादळ, सोसाट्याचे वारे आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम २ आणि ३ जून रोजी सर्वदूर दिसून येईल.

**उत्तराखंडमध्येही मुसळधार पाऊस कोसळणार**

१ ते ४ जून दरम्यान उत्तराखंडमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर ३ जून रोजी पंजाब आणि हरियाणामध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. २ ते ४ जून दरम्यान पश्चिम राजस्थानमध्येही धुळीचं वादळ येऊ शकतात.

**केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेशमध्येही वादळी वाऱ्यासह पाऊस**

१ ते ४ जून दरम्यान केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. केरळ आणि माहीमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि बिहारमध्ये पावसासोबत सोसाट्याचे वारे वाहतील.

## अहिल्यानगरमध्ये विवाह समारंभासाठी मराठा समाजाची आचारसंहिता

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** राज्यभर गाजत असलेल्या पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर मराठा समाजाने विवाह समारंभासाठी आचारसंहिता तयार केली आहे. त्यामध्ये हुंडा घेऊ नका व देऊ नका याबरोबरच लग्नात डीजे व प्री-वेडिंगला बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. आचारसंहिता अंमलबजावणीसाठी ११ जणांची सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

हभप बद्रिनाथ महाराज तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा समाजाची बैठक अहिल्यानगरमध्ये एन. बी. धुमाळ फाउंडेशनने आयोजित केली होती. या वेळी माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, सकल मराठा समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत गाडे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे सरचिटणीस संभाजी दहातोंडे, जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, जिजाऊ ब्रिगेडचे राज्य कार्याध्यक्ष राज्यश्री शितोळे, किशोर मरकड, मराठा वधू-वर सूचक मंडळाचे अशोक कुटे, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, विठ्ठल गुंजाळ, ज्ञानेश्वर काळे आदी उपस्थित होते.

या बैठकीनंतर माहिती देताना हभप तनपुरे महाराज यांनी सांगितले, की मराठा समाजाने अनिष्ट रूढींना तिलांजली द्यावी, बदल करण्यासाठी प्रथम स्वतः प्रत्येकाने बदल करावा. आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय समिती स्थापन करावी. डॉ. निमसे म्हणाले, विवाह सोहळ्याच्या आचारसंहितेबाबत जनजागृती करण्यासाठी किर्तनकार, प्रबोधनकार यांनी पुढाकार घ्यावा. ग्रामीण भागात मुलांच्या विवाहाची समस्या मोठी आहे. त्यावरही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. चंद्रकांत गाडे म्हणाले, विवाहाच्या वेळी मुलींकडून अवास्तव अटी येऊ लागल्याने मुलांचे विवाह होत नाहित. त्यामुळे विवाहेच्छू मुलांबरोबर पालकही हतबल झाले आहेत. पालकांनी आपल्या आपल्या अतिरिक्त अपेक्षा कमी कराव्यात.



**आचारसंहिता पुढीलप्रमाणे -**

मराठा समाजाने विवाह सोहळा १०० ते २०० लोकांच्या उपस्थितीत साजरा करावा. केवळ पारंपरिक वाद्य व लोककलावंतांचा वापर करावा. प्री - वेडिंग हा प्रकार बंद करावा. विवाह, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात साड्या, भेटवस्तू देऊ नयेत. लग्नात हुंडा देऊ व घेऊ नये. लग्न, साखरपुडा,हळद एकाच दिवशी करावे. दशक्रिया विधी व तेराव्याच्या निमित्ताने घातली जाणारी भोजनावळ अशा अनेक प्रथा बंद करावी असे सांगण्यात आले.

## मच्छी- मार्केटमुळे स्थानिक व्यापारी व ग्राहकांसाठी दर्जेदार सुविधा मिळणार

## मच्छी व्यावसायिकांनी घेतली आ. जोरगेवार यांची भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** पंतप्रधान विकास निधीअंतर्गत बंगाली कॅम्प येथील मच्छी मार्केटसाठी ५ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी म्हणजे आपल्या सर्वांच्या विकासाची नवी दिशा आहे. या नव्या मार्केटच्या कामामुळे काही व्यापाऱ्यांना तात्पुरत्या अडचणी येत आहेत.

मात्र, आपल्या सर्व अडचणी सोडवल्या जातील, असे आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले असून नवे मार्केट उभे होईपर्यंत आपला व्यवसाय व्यवस्थित चालावा यासाठी लगतची जागा आरक्षित केली आहे. येथे स्वत्छता,पाणी, स्वच्छतागृह प्रत्येक व्यापाऱ्याला तात्पुरते मीटर, जाण्यासाठी मार्ग आदी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश त्यांनी मनपा प्रशासनाला दिले आहेत. दि. ३१ मे रोजी जनसंपर्क कार्यालयात मच्छी व्यावसायिकांनी आ. जोरगेवार यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या मांडल्या.




यावेळी त्या समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश आ. जोरगेवार यांनी मनपा प्रशासनाला दिले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे सुभाष कासनगोट्टूवार, चंदू वासाडे, विश्वजीत शहा, गोपाल दिवाण, रामजय राजवंशी, अशोक दत्ता, नारायण दास, संजय रॉय, नरथ्थम दास, संजय विश्वास आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यापाऱ्यांशी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, तुमच्या मागण्या गांभीर्याने ऐकल्या आणि लक्षात घेतल्या आहेत. कोणत्याही व्यापाऱ्याचे नुकसान होऊ देणार नाही.

विदर्भातील सर्वात उत्तम मच्छी मार्केट बनविण्याचा आमचा प्रामाणिक संकल्प आहे. या मार्केटमुळे केवळ परिसराता विकास होणार नाही तर सर्वांना एक सुसज्ज, सुरक्षित आणि स्वच्छ जागा मिळणार आहे.

या मार्केटमध्ये मोठ्या व्यापाऱ्यांसह लहान व्यापाऱ्यांचाही सन्मान आणि विचार करण्यात आला आहे. त्यामुळे छोटे व्यापारी आणि गाळेधारक यांच्यासाठीही खास जागा राखीव ठेवण्यात येणार आहे. काम पूर्ण होईपर्यंत व्यापाऱ्यांचा व्यवसाय सुरु राहीला पाहिजे. यासाठी तात्पुरत्या स्वरुपात शेजारील जागा मच्छीमार विक्रेत्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. तिथे नळ, लाईट आणि पाण्याची योग्य सोय केली जाईल. आपल्या मच्छी मार्केटचा विकास हा केवळ इमारत उभारण्याचा प्रश्न नाही, तर हा तुमच्या हक्कांचा सन्मान आणि तुमच्या व्यवसायाच्या वृध्दीचा प्रश्न आहे. तुम्हाला कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, असे यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले.

## संपादकीय

### लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७७ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे – नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७७ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

### पाळी..

खुणावते पर्यटकास
हवा मस्त पावसाळी
वर्षा सहली तुडुंबली
मने सगळी पिसाळी

आबालवृद्धधमन्यात
मुक्त संचार उसाळी
पर्यटक जे अविचारी
दंगामस्तीत कुसाळी

खुणावतात धबधबे
सप्त रंगात झळाळी
उच्छादमांडे लहानगे
म्हातां-या येनव्हाळी

चिंता कुणा खर्चाची
रिती करे टांकसाळी
लुटावाटा गंमतमस्ती
दारु शारू नरसाळी

स्टंटबाजी मारेबाजी
कसेदाजी सळसळी
अपघात घडता घात
सुरुहोतात धावपळी

निसर्गाशी घेती पंगा
दंगा धमाल कुटाळी
रिल्सच्या नादा फंदा
मृत्यूला ते कवटाळी

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# पोळपाटही आकारहीन हवा अमिबासारखा

**श्री. विनोद एस.जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

**सौ.उन्हाळ्यातील सुट्ट्या मुळे माहेरी गेली.म्हणजे सर्वात मोठा प्रश्न पडतो ते दोन वेळेच्या जेवणाचा. एकीकडे आपण म्हणतो बाहेरचं खाणं टाळा अन आरोग्य सांभाळा तसही बाहेरचं दोन्ही वेळेस खाणं म्हणजे शारीरिक नुकसानदायक व आपल्या सारख्या सामान्यांना आर्थिक बाबतीत न परवडणारं ..! म्हणून जेवण घरीच बनवायचं ठरवलं. सुरुवात इथून कि कोणत्या डब्ब्यात काय ठेवलंय हेच कळेना.**

मग काय! हा डब्बा शोध, तो डब्बा शोध, यातच जीव त्रासून जातो. मग पिठ भिजवणे,मळवणे त्याचबरोबर भाजी हे सर्व आलेच पण हा उत्साही जीव ऐकेल तर खरं ना..! ही सर्व पूर्वतयारी आणि त्याही पलीकडे महत्त्वाचे काम म्हणजे भांडी घासणे. भुकेच्या पोटी कसं बसं कच्च बाबडं खाल्लं ही जातं पण पण प्रश्न पडतो तो भांडे धुण्याचा...!पीठ मळणे एक पराकाष्टाचे अन कसोटीचे काम.पिठामध्ये योग्य प्रमाणात पाणी टाकले तर ठीक नाहीतर कढी किंवा पिठलं झालंच म्हणून समजा.पातळ झालं तर पिठ टाका अन जास्त पीठ झालं कि,पाणी टाका यातच दोन पोळ्यांचा भिजवलेला आटा कधी पाच पोळ्यांचा होतो कळतचं नाही. मग ठरते इथंच आपल्या हुशारीची खरी कसोटी...!आपण इतर गोष्टीत लाख हुशार असू द्या.पिठ अन पाणी याचं निश्चित प्रमाण म्हणजे खरा समतोल....!अशाप्रकारे आटा भिजवला. भाजीची तयारी केली आणि जशी जमेल तशी शिजायला शेगडीवर ठेवली आणि आता नंबर पोळ्यांचा...!



गोलाकार तवा गॅसवर ठेवला.एकदम गरमागरम झाला.पोळीची तयारी सुरू,तिकडे तवा तापला परंतु पोळी लाटून तयारच नाही. हातात घेऊन तेल-कोरडे पीठ लावून कसाबसा पिठाचा गोल गोळा पोळपाटावर ठेवला अन लाटणं ठेवून लाटायला सुरुवात केली.लाटणं पिठाच्या गोळ्यावर फिरवतोय...!फिरवतोय...! त्याला गोल करण्याचा प्रयत्न करतोय...!तसा तसा भिजवलेल्या पिठाचा गोळा इकडे-तिकडे वाकडातिकडा पसरतोय. काही केला पिठाचा गोळा लाटण्याने लाटून आवरता आवरल्या जाईना.शेवटी सर्व पोळपाटभर पोळी पसरली पण गोलाकार काही येईना.शेवटी त्यालाही पसरू दिलेच पोळपाटभर..!अन मन भरून बघितलं अन आठवण झाली शाळेतील भूगोलाची....! नेमकं कोणता कोणत्या देशाचा नकाशा बरे हा...!विचारात पोळपाटावरून पोळी हातावर घेऊन तापलेल्या तव्यावर टाकली अन चर्रकन भाजायला सुरुवात झाली.लागलीच वेळ न दवडता दुसरी बनवायला घेतली तोवर तव्यावरची गोलाकार पृथ्वीसारखी कुठे जमीन तर कुठे पाण्याने व्यापलेल्या भागाप्रणाने काही ठिकाणी काळीकुट्ट झाली. भाजता भाजता चटके तर अनेकदा बसले. मग आठवल्या मराठीतील कवियत्री बहिणाबाईची कविता आधी हाताला चटके मग मिळते भाकर..!

भाजलेल्या पोळीकडे बघून मनात विचार आला,सुताराने पोळपाट गोलाकारच का बनवला असावा? आकारहीन बनवायला हवा होता अमिबा प्राण्यासारखा...! त्याला आकार नसतो.आम्हा पुरुषांची परीक्षा घेतो हा गोलाकार पोळपाट..!आम्हा पुरुषांच्या पोळ्याबनतात आकारहीन..! तसाच पोळपाटही आकारहीन हवा अमिबा सारखा..! काहीसा पुरुषी अहंकार जागृत झाला खरा,पण मातृशक्तीला अन आया बहिणींना नमन...! कारण बाप,पती जेवढ्या कष्टानं अन मेहनतीनं कमावून आणतो तेवढंच हाताला लागलेले चटके सहन करून पोटाला पोटभर खाऊ घालण्यासाठी आई,बहीण,पत्नीची महत्वाची भूमिका असते.

# हनी ट्रॅपमध्ये अडकून देशाशी गद्दारी करणाऱ्यांना कठोर शिक्षा द्या

तरुण मुलांसोबत अश्लील चॅटिंग करून त्यांना जाळ्यात ओढणे आणि नंतर त्यांच्याकडून अश्लील कृत्ये करून घेणे ते करताना त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे. ते व्हिडीओ रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांच्या कडून लाखो रुपयांची खंडणी वसूल करणे असा हातखंडा सायबर माफियांनी काही दिवसांपासून अवलंबला आहे. हाच हातखंडा आता पाकिस्ताननेही वापरला असून भारतातील संरक्षक विषयक महत्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तींना सुंदर ललनांच्या जाळ्यात अडकवून त्यांच्या मार्फत भारतातील संरक्षक विषयक महत्वाची माहिती गोळा केली जात आहे. अशीच संरक्षक विषयक महत्वाची माहिती पाकिस्तानला पुरवणारा रवीकुमार वर्मा या तरुणाला पोलिसांनी नुकतेच जेरबंद केले. रविकुमार वर्मा हा एक नव्हे तर दोन पाकिस्तानी महिलांच्या संपर्कात होता. त्याने या दोन्ही महिलांना सोशल मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी भारतीय नौदल आणि डॉकयार्ड मधील पाणबुड्या व जहाजांची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवली होती असे एटीएसच्या चौकशीतून समोर आले आहे. रविकुमार वर्मा हा नेव्हल डॉक मध्ये ज्युनियर मेकॅनिकल फिटर इंजिनियर होता. पाकिस्तानी महिलांची रविकुमार वर्माशी सोशल मीडियावर ओळख झाल्यानंतर या महिलांनी त्याच्यासोबत अश्लील चॅटिंग करून आम्ही तुला प्रत्यक्ष भेटणार आहोत अशी भुरळ घालून त्यास या महिलांनी सतत गुंतवून ठेवले होते. त्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने या महिलांनी त्याला आर्थिक मदतही केली. पाकिस्तानमधून त्याच्या बँक अकाऊंटवर पैसे जमा झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. रविकुमार वर्माच्या या कारनाम्याने देशभर खळबळ उडाली आहे अर्थात हनी ट्रॅपमध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारा रविकुमार वर्मा हा पहिला व्यक्ती नाही. मागील वर्षीच डीआरडीओ या देशाचे संरक्षण साहित्य तयार करणाऱ्या संस्थेत शास्त्रज्ञ असलेल्या डॉ प्रदीप कुरुलकर या व्यक्तीला पोलिसांनी पाकिस्तानला देशाच्या संरक्षणासंदर्भात गुप्त माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक केली होती. विशेष म्हणजे डॉ कुरुलकर हे डीआरडीओ संस्थेत मागील ३८ वर्षांपासून कार्यरत होते. त्यांनी डीआरडीओच्या प्रमुख क्षेपणास्त्रांच्या प्रेक्षपक आणि ग्राउंड सिस्टीमच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावली होती. मिशनशक्ती या उपग्रहभेदी क्षेपणास्त्राच्या प्रेक्षपकाची निर्मिती त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली. डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्यासोबत त्यांनी अनेक वर्षे काम केले होते. त्यांना निवृत्त होण्यासाठी अवघी सहा महिने उरली असताना हे प्रकरण घडकीस आले. गेल्या काही वर्षांपासून ते पाकिस्तानच्या गुप्तचर विभागाच्या महिलेच्या संपर्कात होते. या महिलेने नाव बदलून त्यांच्याशी संपर्क केला. मैत्रीचे ( की प्रेमाचे ) नाटक करून त्यांच्याशी संपर्क वाढवला आणि त्यांच्याकडून देशाच्या संरक्षणासंदर्भात महत्वाची माहिती हस्तगत केली. डॉ कुरुलकर हे पाकिस्तानच्या हनी ट्रॅपमध्ये अडकल्याने देशाच्या संरक्षणा संदर्भातील अनेक महत्वाची आणि गुप्त माहिती पाकिस्तानपर्यंत पोहचली. केंद्र सरकारने याची गांभीर्याने नोंद घेऊन त्यांना त्वरित अटक केली. हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारे हे दोघेच नाहीत या आधीही बीएसएफचा एक जवान, अरुण मारवाह नामक वायुदलातील एक अधिकारी हनी ट्रॅपमध्ये अडकला होता. शत्रूराष्ट्राच्या गोटात शिरून त्यांच्याकडून गुप्त माहिती काढून घेणे यासाठी ललनांचा वापर करणे हे पूर्वीपासूनच चालत आले आहे. सर्वच देश हे करतात मात्र आता माहिती तंत्रज्ञान युगात हे करणे अधिक सोपे झाले आहे कारण सोशल मीडियाच्या माध्यमातून अशा महत्वाच्या पदावरील व्यक्तींना संपर्क साधने आता सहज शक्य आहे. पाकिस्तानच्या गुप्तहेर महिलांनीही हेच केले आणि रविकुमार वर्मा, डॉ कुरुलकर यांना या महिलांनी आपल्या जाळ्यात अडकवले. आता रविकुमार वर्मा यांची पूर्ण चौकशी केली जाईल त्यातून अनेक धक्कादायक माहिती समोर येईल पण देशाची संरक्षण विषयक गुप्त माहिती पाकिस्तानला मिळाली आहे त्यामुळे देशाच्या संरक्षणालाच मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळेच हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणाऱ्या रविकुमार वर्मा सारख्या गद्दारांना कठोर शिक्षा द्यायला हवी.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# आत्महत्या करू नका !

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण सध्या राज्यभर गाजत आहे. ज्याच्यावर डोळे झाकून विश्वास टाकला, ज्याच्यासोबत सात जन्माची गाठ बांधण्यासाठी घरच्यांकडे हट्ट केला अशा माणसाने विश्वासाला तडा दिला, सासरच्यांनी हाल केले आणि एक सुशिक्षित सुज्ञ तरूणी आपल्या पोटच्या गोळ्याला एकटी टाकून परलोकवासी झाली. आज समस्त राज्याच्या भावना वैष्णवीच्या पाठीशी आहेत त्यामुळे आज वैष्णवीच्या सासरच्या मंडळींकडून आणि त्यांच्या वकिलांकडून जे आरोप केले जात आहेत त्याचा सर्वत्र निषेध केला जात आहे. वैष्णवी हगवणे यांच्या सासरच्यांचा एका पक्षाच्या पक्षप्रमुखाशी थेट संबंध असल्याने हे प्रकरण सध्या हायप्रोफाईल बनले आहे. परिणामी समस्त वृत्तवाहिन्या या प्रकरणातील लहान सहान अपडेट्स जाणून घेण्यासाठी लक्ष ठेवून आहेत. दुसरीकडे चालू घडामोडींवर लक्ष टाकले असता मागील आठवडाभरात राज्यात आत्महत्यांची एकामागोमाग एक प्रकरणे उघडकीस आली आहेत. एप्रिल महिन्यात तळोजा परिसरात सोनम नावाच्या तरुणीने पोटच्या मुलीची हत्या करून स्वतः गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली होती. या प्रकरणाची आता उकल झाली असून वंशाला दिवा देऊ शकत नसल्याने सासरची मंडळी करत असलेल्या छळाला कंटाळून सोनमने आत्महत्या केल्याचे उघड झाले. परभणीतील एका २१ वर्षीय तरुणीनेही सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना या आठवड्यात घडली. चुलत भावासोबत असलेल्या प्रेमसंबंधांना विरोध केल्याने उल्हासनगरातील एका १६ वर्षीय मुलीने आत्महत्या केल्याची घटनाही नुकतीच वाचनात आली. अंबरनाथ तालुक्यातील कुशीवली गावात एका प्रेमी युगुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली. डोंबिवलीतील देसलेपाडा परिसरात राहणाऱ्या मोहित नावाच्या एका ३० वर्षीय तरुणाने विष प्राशन करून आपल्या राहत्या घरात आत्महत्या केली. ऑनलाईन गेमिंगच्या आहारी गेल्याने कर्जबाजारी झालेल्या मोहितने कर्ज चुकवणे अवघड झाल्याने आत्महत्या केल्याचे कारण पुढे आले आहे. चंदीगडमधील पंचकुला येथील सात जणांच्या संपूर्ण कुटुंबाने कर्जबाजारीपणामुळे विष प्राशन कल्याची घटना याच आठवड्यात घडली. या सात जणांमध्ये तीन लहान मुलांचाही समावेश आहे. रत्नागिरीतील एका पोलीस पाटलाने आत्महत्या केल्याची घटनाही नुकतीच घडली. या सर्व घटना केवळ एका आठवड्यातील आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्यात गेल्या ६ महिन्यांत १०० हुन अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे वृत्तही हल्लीच प्रकाशित झाले आहे. एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. हा आकडा दोन लाखांच्या घरात असतो, त्यातील एक लाख हे १५ ते ३५ वयोगटांतील असतात, नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. ऐन उमेदीच्या काळात आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात. मात्र आज हा टोकाचा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यामागे कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत याचाही विचार आत्महत्या करणाऱ्याने करायला नको का ? परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा परीक्षेत कॉपी करताना पकडले यांसारख्या क्षुल्लक कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्या करतात. पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, आपल्यामुळे आपल्या पालकांना खाली मान घालावी लागेल या विचाराने विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवतात; मात्र आपल्या अशा जाण्याने पालकांना आयुष्यभराचे दुःख आपण देऊन जात आहोत याचा विचार हे विद्यार्थी केव्हा करणार ? मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर स्वप्न पाहिलेली असतात, क्षणात या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होतो. प्रेमात अपयश आल्याने ऐन तारुण्यात तरुण तरुणी आत्महत्येचा निर्णय घेतात; मात्र हे करताना त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी आजतागायत किती काय केले आहे याचा विचार ते केव्हा करणार. अपेक्षित जोडीदार मिळणे हेच जीवनाचे ध्येय असते का ? आपल्याला लहानाचे मोठे करण्यात आपल्या पालकांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी आपल्याला लावलेली निरपेक्ष माया अशी क्षणात संपवून टाकायची असते का ? नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळते, इतरांची प्रगती होते मात्र आपल्याला डावलले जाते, वरिष्ठ अधिकारी आपल्याला घालून पाडून बोलतात, आपल्यावर कामाचा ताण टाकतात ही कारणे जीवनयात्रा संपवण्यासाठी कारणीभूत कशी काय असू शकतात. प्रयत्न केल्यावर, इतरांची मदत घेतल्यावर या सर्वांवर उपाय खरंच सापडणार नाहीत का ? शेवटी प्रत्येकाचे नशीब हे वेगवेगळेच असते. व्यवसायात कर्जबाजारी झाल्याने काही जण टोकाचा निर्णय घेतात; मात्र आपल्या आत्महत्या करण्यामुळे कर्जाची परतफेड होणार आहे का ? आत्महत्या केल्याने तुमची मुक्तता होईल मात्र तुमच्या घरच्यांनी काय अपराध केला आहे ? काहीजण याही पुढे जाऊन आपल्या मागे घरच्यांना त्रास नको म्हणून मुला बाळांना संपवून स्वतः आत्महत्या करतात. ज्या निष्पाप जीवांचे या सुंदर दुनियेत नुकतेच आगमन झाले आहे त्यांना संपवण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? त्यांना मारताना आपल्या काळजाला भेगा कशा पडत नाहीत ?आपल्या कृत्यात त्या निष्पापांचा अपराध तो काय ?दुर्धरआजाराने कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांनी हे भोग आपल्याच पदरी का पडले आहेत, आपली कर्मे या सर्वाला कारणीभूत आहेत का ? दुर्धर आजाराने ग्रस्त सर्वच जण आत्महत्या करतात का, हा विचार कधी केला आहे का ? कोणत्याही संकटावर आत्महत्या हा उपाय असूच शकत नाही. घरातील एकाच्या आत्महत्येमुळे सारे कुटुंब विस्कळीत होते. आत्महत्या तेच करतात ज्यांचे मन कमकुवत आहे. आत्महत्या हे मानसिक आजाराचे टोकाचे लक्षण आहे. आजमितीला भारतात ज्या प्रमाणात शारिरीक आजाराविषयी जागरूकता आहे त्या तुलनेत कितीतरी पटीने मानसिक आजाराविषयी गैरसमज आहेत. प्रत्येकाला जसा शारीरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; मात्र 'मानसोपचार तज्ज्ञाकडे केवळ वेडेच जातात आणि आपल्याला काही वेड लागलेले नाही' असा फार मोठा गैरसमज भारतीयांत पसरला आहे, परिणामी सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात. आत्महत्या करणाऱ्यांच्याप्रति समाज सहानुभूती दाखवत असला तरी भारतीय संविधानानुसार तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. आत्महत्या केली म्हणजे सुटका होईल या विचाराने आत्महत्या करणारा हे धाडस करतो, मात्र ही खऱ्या अर्थाने सुटका नसतेच असे अध्यात्म सांगते. अध्यात्मानुसार मानवासह प्रत्येक प्राणीमात्राच्या जन्म हा प्रारब्धभोग भोगून संपवण्यासाठी झालेला असतो. त्यामुळे जन्म आणि मृत्यू हे विधिलिखित असते. त्यामध्ये ढवळाढवळ करून स्वतःहून मृत्यू ओढवून घेतल्यास पृथ्वी लोकातील समस्यांपासून सुटका मिळेल; मात्र विधात्याच्या नियोजनात हस्तक्षेप केल्यामुळे आत्महत्या करणाऱ्याचा आत्मा पुढील अनेक वर्षे भुवलोकात हालअपेष्टा सहन करत तडफडत असतो. त्या सहन करून संपवल्याशिवाय त्याला पुढच्या योनीमध्ये जन्म मिळत नाही. ८४ लक्ष योनीचा फेरा पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या मनुष्य जन्माचे सार्थक करणे विधात्याला अपेक्षित असते; मात्र स्वतःच्या कर्मदरिद्रीपणाने आत्महत्येसारखी पळवाट स्वीकारणाऱ्याची मृत्यूनंतरही सुटका नसते. त्यामुळे आत्महत्या करून सूटका होते हा केवळ गैरसमज आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पानगावमध्ये अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.०१, पानगाव :** रेणापूर तालुक्यातील पानगाव मध्ये श्री खडोबा मंदिर या ठिकाणी शनिवार ३१ मे रोजी सकाळी १० वाजता अहिल्यादेवी देवी होळकर यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी मान्यवरा हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमा ला सुरवात करण्यात आली. या दत्तात्रय डोणे यांनी अहिल्यादेवी होळकर यांनी केलेल्या कार्याची ओळख व माहिती दिली प्रतिकूल परिस्थिती मध्ये अहिल्यादेवी यांनी मात करून त्यावेळी राज्यकरते इंग्रज सरकारशी कसे दोन हाता केले याची माहिती दिली. तसेच जेष्ठ मार्गदर्शन अप्पा डोणे यांनी सुद्धा अहिल्यादेवी होळकर यांनी न्याय दानाचे काम ज्या एक निष्ठने केले याची माहिती दिली. व आज प्रत्येक न्यायालयात अहिल्यादेवी होळकर यांचा फोटो असावा असं मत यावेळी व्यक्त केले. व समाजाने एकत्र राहावे आणि एक निष्ठ राहावे असं मत व्यक्त केले.

अहिल्यादेवी होळकर यांनी काशी ते कन्याकुमारी पर्यत अनेक महादेव मंदिराचा जीर्णोद्धार अहिल्यादेवी होळकर यांनी केले. सुकेशभंडारे, सूर्यकांत चव्हाण, दत्तात्रय डोणे, दत्तात्रय भंडारे, चंद्रचूड चव्हाण, अभिजित चव्हाण, शिवाजी आचार्य, उत्तरेश्वरअप्पा हलकुडे, गजानन फुलारी, वीरेंद्र चौहान, रंगनाथ डोणे, उमेश जोशी, पप्पू माने, श्रीराम डोणे, अच्युत डोणे, शिवा डोणे, आकाश डोणे, कृष्णा गुडदे, रामेश्वर डोणे, लखन धाकपाडे, दत्ता गुडदे, पप्पू कस्पटे, पप्पू माने, प्रथमेश डोणे, सतीश वालेकर, दयानंद डोणे, ओमकार वालेकर, अनंत व संतोष काकडे इत्यादी यावेळी उपस्थित होते.

## लिफ्ट देऊन प्रवाशाला लुटणाऱ्या चोरट्यांना रामनगर पोलीसांनी केले गजाआड



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** येथील बंगाली कॅम्पमध्ये चामोर्शीकडे जाणाऱ्या बसती वाट बघत असलेल्या गोपेश गोविंद कुंडू या इसमाला लिफ्ट देऊन दुचाकीस्वार असलेल्या दोन तरुणांनी लुटल्याची घटना २९ मे रोजी घडली. या घटनेची तक्रार प्राप्त होताच रामनगर पोलिसांनी तत्काळ आरोपींचा शोध घेऊन आरोपी युवकांना अटक केली व त्याचेकडून १ लाख २८ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

प्राप्त माहितीनुसार, २९ मे रोजी दुपारी ३.३० वाजता बंगाली कॅम्प, चंद्रपूर येथून चामोर्शी, जि. गडचिरोली कडे जाण्यासाठी बसची वाट पाहत थांबलेला गोपेश गोविंद कुंडू , रा. नरेंद्रपूर, पोस्ट गुंडापल्ली, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यास शाईनं मोटारसायकलवरील दोन व्यक्तींनी त्यास कुठे जायचे आहे असे विचारुन तुला बल्लारशहा येथे सोडतो असे सांगून त्यांचे मोटारसायकलवर बसवून बल्लारशहा येथे न नेता जुनोना चौक ते जुनोना गाव जाणारे डांबरी रोडलगत जंगलातील झाडाझुडपात नेऊन त्यास मारहाण करुन त्याचे कब्जातील मोबाईल, सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटले. यानंतर फिर्यादी इसमाने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. रामनगर पोलीस स्टेशनच्या शोध पथकातील अधिकारी व अंमलदार तपास करत असताना सदरचा गुन्हा स्मित राजेश्वर कोटे, वय ३० वर्षे व प्रकाश भुरेलाल कबीरदास, वय ३१ वर्षे, दोघे रा. बल्लारशाह, यांनी केला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्याचा शोध घेण्यासाठी दोनही आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांचेकडून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मालातील फिर्यादीचा मोबाईल, रोख रक्कम व सोन्याचे दागिने तसेच गुन्ह्यातील वापरलेली मोटारसायकल व मोबाईल असा एकूण १ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून दोन्ही आरोपींना गुन्ह्यात अटक केली आहे.

## मे महिन्यातील ३१ सेवानिवृत्तांचा महापालिकेत सन्मान



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** महानगरपालिका सेवेतून मे महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या ३१ अधिकारी, कर्मचारी, शिक्षकांचा सेवानिवृत्ती समारंभ महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, परिमंडळ २ उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, भांडार विभाग उपआयुक्त शंकर खाडे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, सहा. आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण, शिक्षणाधिकारी अरूणा यादव व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षकवृंदाला शुभेच्छा देताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी महानगर पालिकेच्या आजवरच्या नावलौकिकात आपण सर्वांनी केलेल्या चांगल्या कामाचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. यापुढे झपाट्याने काळ बदलत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा कार्यालयीन कामकाजात वापर करून नागरिकांची कामे अधिक सुलभपणे होण्याकडे व त्यासाठी ऑनलाईन सेवा सुविधा पूर्तीकडे विशेष लक्ष देण्यासाठी सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांनी सज्ज असायला हवे असे मत मांडले. अत्यंत दिलखुलास संवाद साधताना त्यांनी कार्यालयातील बॉसचे व कर्मचाऱ्यांचे ४ – ४ प्रकार सांगून यात आपण नेमके कोणत्या कॅटेगरीत आहोत याचा उपस्थितांना विचार करायला भाग पाडले व अंतर्मुख केले. सेवानिवृत्तीनंतर आपल्या कुटुंबियांना वेळ द्या. एकटे राहू नका. चांगल्या मित्रांच्या संपर्कात रहा असा मित्रत्वाचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी उपआयुक्त शरद पवार व डॉ.कैलास गायकवाड, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांनीही शब्दसुमनांतून शुभेच्छा दिल्या.

## 'एसटी'चा प्रवास सुखकर व्हावा !

एसटी अर्थात समस्त राज्याची लाडकी 'लालपरी'चा वाढदिवस नुकताच संपन्न झाला. ३६ गाड्यांसह सुरु झालेल्या एसटीचा प्रवास आज राज्यभरात अविरतपणे सुरु आहे. आजमितीला १८ हजाराहून अधिक गाड्या महामंडळात सेवा देत आहेत. शहरी भाग सोडला तर एसटी हा ग्रामीण भागातील नागरिकांचा नेहमीच जिवाभावाचा विषय ठरला आहे. तालुक्यात शिक्षणासाठी प्रतिदिन जाणारी शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळी असो वा आठवडी बाजारात खरेदीसाठी जाणारी ग्रामस्थ मंडळी असो, माहेरी पाहुणचार घेण्यासाठी आलेली नवविवाहिता असो वा नोकरी व्यवसायानिमित्त दैनंदिन प्रवास करणारी मंडळी असो सर्वांनाच इच्छित स्थळी नेण्याचे आणि आणण्याचे काम आजवर राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीने केले आहे. एसटीचे चालक-वाहक आणि एसटीने नियमित प्रवास करणारी मंडळी यांच्यामध्ये एक अतूट नाते निर्माण झाले आहे. नेहमीची व्यक्ती स्थानकावर दिसली नाही कि एसटीच्या वाहकालाही चुकल्याचुकल्या सारखे वाटते. एसटीच्या चालकांनाही नेहमीच्या रस्त्यातील खड्डे, गतिरोधक, वळणे अगदी तोंडपाठ झालेली असतात त्यामुळे एखाद्या ठिकाणी अधिक प्रवासी चढले उतरले तरी नेहमीच्या थांब्यांवर एसटीची यायची वेळ सहसा चुकत नाही. आज जी कोकण रेल्वे भरभरून वाहते आहे हा सारा भार पूर्वी एसटी आपल्या अंगा खांद्यावर वाहत होती. आजमितीला ज्या गावात अन्य वाहने पोहोचली नाहीत अशा गावांतही एसटीचे जाळे पसरले आहे. आजही सुट्टीत शहरातून गावाला जायचे म्हटले तर रेल्वे स्थानकावर उतरल्यावर पुढचा प्रवास अनेकांना एसटीनेच करावा लागतो. वाढत्या महागाईसोबत लोकांची मिळकतही वाढली, मिळकत वाढल्याने राहणीमानही बदलत गेले, त्या अनुषंगाने परिवहन महामंडळातही अधिक सोयी आणि सुविधा पुरवणारे बदल झाले. शहर वाहतुकीत वातानुकूलित गाड्या आल्या तशा राज्य परिवहन महामंडळातही गारेगार प्रवासाचा अनुभव देणाऱ्या वातानुकूलित गाड्यांचा प्रवेश झाला. या गाड्यांना राज्यातील नागरिकांनीही भरभरून प्रतिसाद दिला आणि आजही देत आहेत. आता तर इलेक्टिक बसेसही महामंडळात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणातही एसटी हातभार लावत आहे. राज्य सरकारने महिला प्रवाशांसाठी तिकीट दरात ५० टक्के सूट दिल्यामुळे महिला प्रवाशांची संख्या कमालीची वाढली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आता महिला वाहक ही एसटी गाड्यांतून जागोजागी दिसू लागल्या आहेत.





रस्त्यांचे जाळे गावागावांत पसरले असले तरी सर्वच रस्ते गुळगुळीत आहेत असे नाही. अनेक ठिकाणी मातीच्या कच्च्या रस्त्यांतून एसटीला प्रवास करावा लागतो. आजमितीला राज्यातील अनेक भागांत रस्ता रुंदीकरणाची आणि दुरुस्तीची कामे सुरु आहेत अशा वेळी खडकाळ रस्त्यातून मार्ग काढत लालपरी नागरिकांना इच्छित स्थळी पोहोचवण्याचे कार्य अविरतपणे करत आहे.

आजमितीला अनेक भागांत मोठ्या प्रमाणात प्रवासी उपलब्ध असताना त्या भागांत एसटीच्या दिवसातून केवळ २ ते ३ फेऱ्या होतात. मधल्या काळात स्थानिक वडापवाले कोंबून प्रवाशी भरून बक्कळ पैसे कमावत असतात. राज्यातील जवळपास सर्वच एसटी डेपोच्या बाहेर वेगवेगळ्या मार्गाने प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या काळी पिवळी गाड्यांचा समूह प्रवाशांना हातवारे करत बोलावताना दिसून येतो. या ठिकाणी एसटी बसेस जाऊ शकत नाहीत का ? दरवर्षी एसटी महामंडळ तोट्यात असल्याचे दाखवण्यात येत असले, तरी एसटीला नफ्यात आणण्याचे उपायसुद्धा एसटीकडेच आहेत. आजमितीला एसटी महामंडळाकडे असलेला बसगाड्यांचा ताफा राज्याच्या वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या तुलनेत खूपच अल्प आहे. काही मार्गांवर धावणाऱ्या एसटी बसेसची संख्या कमी असल्याने जेव्हा केव्हा या गाड्या थांब्यावर येतात तेव्हा प्रवासी त्यावर तुटून पडतात. एकमेकांना मागे टाकत बसमध्ये बसण्यासाठी जागा मिळवण्याच्या संघर्षात महिला, लहान मुले, वयोवृद्ध यांचे अतोनात हाल होतात. सणासुदीच्या काळात महामंडळाकडून जादा गाड्या सोडूनही त्यासुद्धा कमी पडतात, ज्याचा लाभ खासगी ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट कंपन्या घेतात, इच्छित स्थळी जाण्यासाठी प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडी आकारतात. एसटी उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना नाईलाजाने या लुटीचा सामना करावा लागतो. कालानुरूप अद्यावत होत असणारे एसटी महामंडळ वाढत्या लोकसंख्येनुरुप गाड्यांची संख्या का वाढवत नाही ? गाड्या वाढल्या कि प्रवाशांची सोय तर होणारच आहे शिवाय अनेकांना रोजगारही उपलब्ध होणार आहेत. आजही अनेक एसटी बसेसमध्ये आसने मोडलेली दिसून येतात, खिडकीच्या काचा पुढे मागे सरकत नाहीत, पावसाळ्यात छत गळत असते, बाहेरील बाजूने पत्रे वाकलेले अथवा बाहेर आलेले असतात. गाड्यांचे सस्पेन्शन ढिले झालेले असते. एसटी बस थांब्यावर येते तेव्हा ती कुठे जाणार आहे याबाबतचा फलक बऱ्याचदा लावलेला नसतो, काही वेळा वाहकांचे प्रवाशांशी बोलणे उर्मटपणाचे असते. एसटी आगाराच्या स्थितीबाबत तर बोलायलाच नको. एसटी आगाराच्या भिंती, प्रसाधनगृह गुटखा-पान खाऊन प्रवाशांनी रंगवलेल्या दिसून येतात, अनेकदा प्रसाधनगृहात पाणी नसते, आगारांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था दिसून येत नाही, असलीच तर त्या ठिकाणची अस्वच्छता पाहिल्यावर बाहेर विकत घेऊन पाणी पिणे सोयीचे वाटते, एसटी आगारात असलेल्या उपहारगृहात नेहमीच पदार्थांची वानवा असते. प्रवाशांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या चौकशी कक्षातील कर्मचारी प्रवाशांशी उद्धटपणे बोलत असतात. एखाद्या आगाराचे दुरुस्तीचे काम काढले तर ते पुढे वर्षोनुवर्षे चालूच असते. एसटी महामंडळ हा एक सेवाभावी उपक्रम आहे. या उपक्रमातील त्रुटी दूर करून ग्राहकांचा प्रवास सुलभ आणि सुखकर व्हावा यासाठी राज्य सरकार काही प्रयत्न करणार आहे का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## ओसाड पडीक जमीनींवर फळझाडे लावून कोकणाचे नंदनवन करावे - सरपंच जनार्दन आंबेकर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०१, गुहागर :** भारत हा कृषी प्रधान देश,महाराष्ट्रातील कोकण प्रांतात पूर्वी शेती हाच मुख्य व्यवसाय होता. आजी-आजोबा ते आई- वडीलांच्या पिढी पर्यंत सर्वच शेतकरी प्रामुख्याने शेती व्यवसाय करून भात, नाचणी, वरी, हरीक तसेच चवळी, उडीद, कुळीथ, तुरडाळ इत्यादी कडधान्ये आणि शेताच्या बांधावर वांगी, भेंडी, गवार, मिरची इत्यादी भाज्या, परसातील पालेभाज्या, पावसाळ्यात रानमाळावर उगवणाऱ्या रानभाज्या तर बांधावरचे आंबाडा ज्यांचा दोर किंवा बंध आणि चूल व दिवाबत्ती पेटविण्यासाठी उपयोग व्हायचा. या सगळ्या साध्या- सोप्या जीवनशैलीत अशिक्षितपणा किंबहुना शिक्षण बेताचे असताना सुद्धा ग्रामीण भागातील सर्व शेतकरी कुटुंबे सुखी, समाधानाने आणि आनंदी जीवन जगत होती.



निसर्गसृष्टीत ग्लोबल वार्मिंगमुळे होणारे फेरबदल आणि बदलती जीवनशैली, शिक्षणाचा प्रचार व प्रसार, नवनवीन शोध-संशोधने, कष्टांची, श्रमांची कामे करण्याकडे दुर्लक्ष ईत्यादी कारणामुळे सद्याची तरूण पिढी नोकरी-धंदा, व्यवसायासाठी शहरांकडे आकर्षित होताना दिसतो आहे.

शिवाय नैसर्गिक आपत्ती, वानर, माकडे यांची वाढती प्रजाती आणि उपद्रवी रानडुक्कर, रानगवे यांचा त्रास,यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासन अजून ठोस उपाययोजना करताना दिसत नाही शिवाय मोलमजुरीसाठी उपलब्ध नसलेले कामगारवर्ग इत्यादी कारणांमुळे शेती/बागायती करणे कठीण होत चालले आहे.

वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. तरी पण आपण आपल्या ओसाड पडीक जमीनीं वापरात आणायच्या की नाहीत ? शासनाच्या कृषी विभागाकडून मिळणाऱ्या १००% अनुदानातील आंबा, काजू, नारळ,सुपारी,आवळा, कोकम (रातांबा), जांभूळ इत्यादी फळझाडे तर खैर, साग, बांबू इत्यादी उत्पन्न देणारे वृक्ष लागवड करण्यासाठी सुद्धा अनुदान मिळते. याचा फायदा सर्व शेतकर्यांनी घेऊन आपापल्या ओसाड पडीक जमीनींवर फळझाडे लागवड करणे हिताचे आहे.

आपले कृषी विभाग, कृषी अधिकारी उत्तम प्रकारे जनजागृती साठी प्रचार आणि प्रसार करत आहेत त्यांना साथ देऊन आपण आपल्या ग्रामपंचायती मार्फत प्रस्ताव करण्यासाठी कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी जरूर संपर्क साधावा आणि ओसाड पडीक जमीनींवर फळझाडे लावून फलोत्पादन करून कोकणाचे नंदनवन करावे असे आवाहन उमराठचे सरपंच जनार्दन आंबेकर यांनी कोकणातील समस्त शेतकरी बंधूंना केले आहे.

## शेतकऱ्यांचे डिमांड कायम ठेवत कृषी पंपांना वीज जोडणी द्या !

### शेतकऱ्यांच्या हितासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी पंपाच्या विद्युत जोडणीसाठी भरलेली डिमांडची रक्कम परत करण्याचे आदेश विद्युत विभागाने दिले आहेत. शेतकऱ्यांना संकटात टाकणारे हे आदेश असून याविषयाकडे विशेष लक्ष देऊन शेतकऱ्यांना डिमांडची रक्कम परत न करता ती कायम ठेवून कृषी पंपाची विद्युत जोडणी द्यावी, अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना केली आहे.

कृषी पंपाच्या विद्युत जोडणीसाठी भरलेल्या डिमांडबाबत शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत अनेक शेतकऱ्यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन देऊन मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या हितासाठी आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी



फडणवीस यांना निवेदन देऊन विनंती केली आहे.

चंद्रपूर जिल्हा आदिवासी बहुल असून, वीज निर्मितीच्या क्षेत्रात राज्यातील अग्रणी जिल्ह्यांपैकी एक आहे. या जिल्ह्यात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या माध्यमातून वीज निर्मिती होते. तसेच महाराष्ट्रातील ९५ टक्के वीज बिल भरणा सुद्धा या जिल्ह्यातून होतो. शेतकऱ्यांनी कृषी पंपाच्या विद्युत जोडणीसाठी आवश्यक असलेली डिमांड रक्कम महावितरणकडे भरण्यात आलेली आहे.

परंतु विविध कारणामुळे या विद्युत जोडण्या अद्याप दिल्या गेल्या नाही. महावितरणने शेतकऱ्यांनी भरलेली डिमांडची रक्कम शेतकऱ्यांना परत करण्याचे मौखिक आदेश देण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे. तरी शेतकऱ्यांनी भरलेली डिमांडची रक्कम परत न करता त्यांना कृषी पंपाचे विद्युत जोडण्या विशेषबाब म्हणून उपलब्ध करून द्याव्यात. त्याअनुषंगाने याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश देण्यात यावे, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या आदर्शातून समाजसेवेचा संकल्प करा - आ.मुनगंटीवार

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त मुलमध्ये सिंदूर तिरंगा यात्रा, महिला मेळाव्याचे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, मूल (चंद्रपुर) :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रीशक्तीचा शाश्वत आणि तेजस्वी वारसा समाजापुढे ठेवला आहे. राज्यकारभार सांभाळताना त्यांनी आदर्श समाजाची रचना केली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत नारीशक्ती पुढे आली, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या संकल्पनेतील समाज साकार होईल. त्यामुळे त्यांच्या जीवनकार्यातून प्रेरणा घेऊन समाजसेवेचा संकल्प करा, असे आवाहन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त मूल येथे चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता पार्टी महिला आघाडीतर्फे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमात 'सिंदूर तिरंगा यात्रा' च्या माध्यमातून महिला शक्तीने उत्स्फूर्तपणे देशभक्तीचा जल्लोष साजरा केला. भाजपाच्या युवा महिला मोर्चाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात भारत माता की जय च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला.

याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, माजी जि.प.च्या अध्यक्षा संध्याताई गुरनुले, महिला मोर्चा प्रदेश महामंत्री अल्का आत्राम, महिला मोर्चा अध्यक्ष वंदना शेंडे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, रत्नमाला भोयर, मंगेश गुलवाडे, उषाताई शेंडे, चंदू मारगोनवार, किरणताई बुटले, नीलम सुरमवार, डॉ. किरण कापगते, शर्मा, नम्रता ठेमस्कर, वीरमाता ताराबाई आत्राम, जनाबाई दास आदी उपस्थित होते.

आ.सुधीर मुनगंटीवार यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मृतीला अभिवादन करत महिलांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आत्मनिर्भरता, आत्मसन्मान आणि सामाजिक परिवर्तनाचा वसा घ्यावा, असे आवाहन यावेळी केले. त्यांनी वीर मातांचा सन्मान करत त्यांच्यासमोरील त्यागाला नतमस्तक होत देशसेवेचा संकल्प केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे




स्मरण आपण आज ३०० वर्षांनंतरही करतो, यामागे एकच कारण आहे. त्यांनी भूभाग जिंकण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या हृदयात स्थान मिळवण्यासाठी राज्य केले. गरिबांना न्याय मिळावा, जनतेला पाणी व अन्न मिळावे. यासाठी त्यांनी राज्यकारभार केला. त्यांनी सम ाजासाठी विहिरी बांधल्या, अन्नछत्रे सुरु केली. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धारतयोगदान दिले.

समाजाच्या कल्याणासाठी आयुष्य वाहिलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे आदर्श घेत आपण समाजाची सेवा करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही आ. मुनगंटीवार यांनी केले. आमदार मुनगंटीवार पुढे म्हणाले, एक आई आपल्या मुलाला देशाच्या रक्षण करताना गमावते, ही भावना शब्दातीत आहे. आपल्या रक्षणासाठी त्यांच्या कुटुंबातील सदस्य महिनोन्महिने सीमांवर असतात. या मातांच्या त्याला माझा सलाम. आपण जर खरंच पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन करायचे असेल, तर त्यांच्या मार्गावर चालत समाज आणि देशसेवेसाठी एकत्र येत, समाजाची प्रगती केली पाहिजे हीच खरी आदरांजली ठरेल, असेही आवाहन त्यांनी केले.

# थोडक्यात

## वासुंदे येथे मोफत फळबाग लागवड कार्यक्रम

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** सुजित झावरे पाटील यांच्या पुढाकाराने झाडे पर्यावरण संस्थेच्या वतीने वासुंदे येथे शेतकऱ्यांसाठी नावीन्यपूर्ण मोफत फळबाग लागवड कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या



उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना केशर आंबा, कालीपत्ती चिकू, मोसंबी, संत्रे, जांभूळ (कोकण बहाडोली), फणस, चिंच (प्रतिष्ठान) आणि नरेंद्र आवळा यासारख्या उच्च प्रतीच्या कलम रोपांचे मोफत वाटप केले जाणार आहे. या कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अॅग्रोफॉरेस्ट्री प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोफत फळझाडे उपलब्ध करून देण्यासोबतच पुढील ३ वर्षे तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाणार आहे. सुजित झावरे पाटील यांनी सांगितले की, हा प्रकल्प पारनेर तालुक्यातील विविध भागांमध्ये राबवला जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढेल आणि शाश्वत शेतीला चालना मिळेल.संस्था आणि मनरेगा यांच्या भागीदारीतून हा प्रकल्प खर्चमुक्त पद्धतीने राबविला जाणार आहे. लवकरच तालुक्यात अॅग्रोफॉरेस्ट्रीच्या विविध पद्धती, लागवड तंत्रज्ञान, आर्थिक संधी आणि शाश्वत शेती यावर प्रशिक्षण आयोजित केले जाईल. या प्रशिक्षणात रोजगार सेवकांनी गावातील लाभार्थी शेतकऱ्यांना सहभागी करून घ्यावे, असे आवाहन झावरे पाटील यांनी केले. प्रशिक्षणानंतर शेतकऱ्यांना मोफत फळझाडांचे वाटप होईल. हा उपक्रम शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसह पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देणारा ठरेल. स्थानिक नेतृत्व आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने हा प्रकल्प यशस्वी होण्याची खात्री असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

## धारूर आगारास ५ नविन बस आ.सोळंकेंचे हस्ते पुजन करून शुभारंभ



**अक्षराज : शुंभम शुक्ला**

**दि.०१, किल्लेधारूर (बीड) :** किल्ले धारूर एस.टी आगारास ५ नवीन एस.टी बसेस प्राप्त झाल्या असून आमदार प्रकाश दादा सोळुंके यांच्या पाठपुराव्यामुळे या गाड्या प्राप्त झाल्याने त्यांच्या हस्ते पूजन करून या गाड्यांचा शुभारंभ हा रविवार, दिनांक ०१ जुन २०२५ रोजी करण्यात आला. यावेळी विविध शिष्टमंडळाने भेटून आ. सोंळके यांना विविध विकास कार्याची निवेदन दिले. धारूर आगार हे बीड जिल्ह्यामध्ये उत्पन्नात अग्रेसर असणारे एस.टी आगार आहेत. या आगारास मानव संसाधन विकासच्या विद्यार्थ्यांनी वाहतुकीसाठी ४ नवीन बसेस मागील महिन्यात आल्या होत्या. मात्र सर्वसामान्य प्रवासासाठी लागणाऱ्या लालपरी अद्याप आल्या नव्हत्या. जिल्ह्यात इतर सर्व आगारास या गाड्या येत होत्या. या ही आगारास या गाड्या मिळाव्यात. यासाठी आ. प्रकाश दादा सोळके यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. त्यांनी राज्य परिवहन मंत्राकडे पाठपुरावा करून या आगारास ५ बसेस मिळवून दिल्या या बसेसचा शुभारंभ दिनांक ०१ जून २०२५ रोजी त्यांच्या हस्ते फित कापून व या गाड्याचे पूजन करून करण्यात आले. यावेळी जिल्ह्याचे धारूर आगाराचे पालक अधिकारी मुंडे, धारूरचे आगार प्रमुख नवनाथ चौरे येथील कर्मचारी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष अमोल जगताप, न.प. गटनेते सुधीर शिनगारे, शहराध्यक्ष नितीन शिनगारे, शेख फसियोद्दीन, सचिन जाधव, गणेश सावत, गणेश जाधव, ज्ञानेश्वर शिंदे, ऍड.मोहन भोसले, सुरेश अंडील व शहरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच प्रवासी ही यावेळी उपस्थित होते.

## कळंब बस स्थानकात एस.टी चा ७७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०१, धाराशिव :** धाराशिव येथील बस आगार प्रशासना मार्फत रा.प.म हामंडळाच्या कळंब बस स्थानकावर एस.टी. चा ७७ वा वर्धापन दिन रविवार, दिनांक ०१ जून २०२५ रोजी सकाळी फीत कापून व ज्येष्ठ नागरिकांच्या हातून केक कापून आणि प्रवाशांना गुलाब फुले तसेच मिठाई वाटून साजरा करण्यात आला. यावेळी बस स्थानकावर रांगोळी, केळीचे पाणे, तोरण बांधून स्थानक सजवण्यात आले होते. यावेळी प्रवाशांना गुलाब फूल देऊन त्यांचे स्वागत केले तर मिठाई वाटून आनंदोत्सवात साजरा केला. प्रवाशांना बरोबरच वाहक चालक यांचा सत्कार ही यावेळी केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुखएस.टी खाताळ हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिवचे यंत्र अभियंता सूर्यकांत थोरबोले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, कार्यशाळा अधीक्षक बालाजी भारती हे होते. तर वाहतूक निरीक्षक निलेश जाधव हे होत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून कळंब तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास मुळीक व कळंब आगारातील सर्व पर्यवेक्षक व कर्मचारी यांची उपस्थिती होती. तसेच प्रवाशांना साखर व पेढे वाटण्यात आले. या कार्यक्रमासाठी कार्यशाळा सहाय्यक वाहतूक निरीक्षक अभिजीत धाकतोडे, प्रभाकर झांबरे, लखन कांबळे, अभिजिन गायकवाड, रामलिंग जाधवर, वाहतूक नियंत्रक सुशिल हुंबे, चेतन गोसावी, प्रशांत नानजकर, हनुमंत मुंडे, वाहक एस.आर. जगताप, विलास जाधव, अभिजीत गायकवाड, ज्योतीराम तौर तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश गोरे यांनी केले. महिला कर्मचाऱ्यांमध्ये अलका भोसले, प्रियंका शिंदे, तरमिम शेख, अश्विनी तिडके, वंदना पालके, संध्या कुमठेकर, राजकन्या गवळी सह आदींनी परिश्रम घेऊन एस.टी चा अमृत महोत्सव उत्साहात साजरा केला.

## अहिल्यानगरमध्ये करोनाचे दोन नवे रुग्ण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** महाराष्ट्रात करोना रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. नगर जिल्ह्यातही करोनाचे दोन नवे रुग्ण सापडले असून यातील एकावर नगरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर दुसर्‍याला पुढील उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आले असल्याची माहिती महानगरपालिका आरोग्य विभागाच्यावतीने देण्यात आली. नगरमध्ये खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेला रुग्ण अत्यवस्थेत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, राज्यात मे महिन्यात करोनाचे सर्वाधिक ४०५ रुग्ण आढळले आहेत. सद्यस्थितीत ४६७ रुग्ण सक्रिय असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत एकूण ७ मृत्यू कोविडशी संबंधित असून हे रुग्ण आधीपासूनच विविध गंभीर आजारांनी ग्रस्त होते. मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांमध्ये काहींना मूत्रपिंड विकार, मेंदू विकार, मधुमेह, फुफ्फुसाचे विकार आणि इतर सहव्याधी होत्या. कोविडचे रुग्ण तुरळक प्रमाणात आढळत असून नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, नगरमध्ये नव्याने करोना रुग्ण आढळल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी आरोग्य विभागाची तातडीने बैठक घेत सूचना दिल्या आहेत. जिल्हा रुग्णालयात करोना बाधितांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच मनपाने जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे अँटीजेन चाचणीच्या ४०० किटची मागणी केली असून ज्या ठिकाणी करोना रुग्ण सापडले आहेत. त्याठिकाणी त्यांच्या संपर्कात असणार्‍यांना शोधून गंभीर लक्षणे नसणार्‍यांना घरातच ठेवण्यात येणार आहे, तर गंभीर लक्षणे असणार्‍यांवर आरोग्य संस्थेत उपचार करण्यात येणार असल्याचे मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतिश जेजूरकर यांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयात प्रशासन वाढत्या करोनावर लक्ष ठेवून असून जिल्हा रुग्णालयात करोनाची आरटीपीसी चाचणी सुरू करण्यात आली असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेराव चव्हाण यांनी सांगितले.

## नळदुर्ग येथील नर-मादी धबधबा प्रवाहित

**अक्षराज : विश्वास वराळे**




**दि.०१, धाराशिव :** तालुक्यामध्ये साधारणता १५ दिवसांपासून झालेल्या मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने नळदुर्ग किल्ल्यातील ऐतिहासिक प्रेक्षणीय असलेल्या पाणी महाल येथील नर-मादी या धबधब्यापैकी मादी धबधबा प्रवाहित झाला आहे. भुईकोट किल्ल्यातील धबधबा मे महिन्यात वाहण्याची ही घटना दुर्मीळ आहे. त्यामुळे पर्यटकांची रेलचेल येथील परिसरात पाहायला मिळाली. तालुक्यातील बोरी धरण क्षेत्रामध्ये मे महिन्यात आतापर्यंत २७० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. ही नोंद पावसाच्या वार्षिक सरासरीच्या सुमारे २५ ते ३० टक्के इतकी आहे. धरण क्षेत्रातील पावसामुळे बोरी धरणातील पाणीसाठ्यात वाढ होऊन सुमारे २७ टक्के पाणीसाठा झाला आहे. किल्ल्यातील मादी धबधबा वाहण्याची मे महिन्यातील ही पहिलीच वेळ आहे. येथील बोरी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर धरणाच्या सांडव्यातून पाणी प्रवाहित झाल्यानंतरच किल्ल्यातील नर - मादी वाहतात. अशी पर्वणी जुलैनंतर येते. यावेळी मॉन्सून पूर्व अवकाळी पावसाने ही पर्वणी दिली आहे. पावसामुळे भुईकोट किल्ल्यातील परिसर हिरवळीने नटल्याचे पाहायला मिळत आहे.

## अखेर महावितरणच्या दोन दोषी कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०१, बिलोली (नांदेड) :** बिलोलीतालुक्यातील मौजे दर्यापूर शिवारात महावितरणच्या कामकाजासाठी खांबावर चढलेल्या युवकाचा विजेचा शॉक लागुन मृत्यू झाल्याची घटना दिनांक ०८ मे २०२५ रोजी घडली होती. सदर घटनेवर चादर टाकून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र सामाजिक कार्यकर्ते पत्रकार व नातेवाईकांनी सदर घटनेत चार कर्मचारी दोषी असून संबंधितावर कार्यवाही व्हावी. अशी मागणी केली होती. महावितरणच्या वरिष्ठांनी केलेल्या चौकशी अहवालानंतर सदर घटनेत दोनच कर्मचारी दोषी आढळून आल्याने संबधितावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. बडूर (बामणी) उपकेंद्रातून निघालेल्या हिंगणी फिडरवर कामासाठी परमिट घेऊन काम चालू असताना लाईनमन साहेबराव जेठे व ऑपरेटर शरद जोशी यांच्या चुकीमुळे दर्यापूर येथील शिवराज भाऊसाहेब शिवशेट्टे यांचे अपघाती निधन झाले होते. महावितरणच्या वरिष्ठांकडून लाईनमन साहेबराव जेठे व ऑपरेटर शरद जोशी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

## पावसाने लोणजाई माता टेकडी परिसरात निसर्गरम्य वातावरण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यात वसलेल्या विंचूर जवळच असलेल्या लोणजाई माता मंदिर परिसर सध्या निसर्गरम्य वातावरणाने नटलेला आहे. टेकडी वर असलेले हे मंदिर आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर हिरवीगार वनराई आणि शांततेने नटलेला असून भाविकांसाठी तसेच निसर्ग प्रेमींसाठी एक आशेचा किरण बनला आहे. सध्याच्या काळात, लोणजाई माता मंदिर परिसरातील निसर्गाने आपले सौंदर्य अधिकच खुलवले आहे. आजूबाजूला पसरलेली हिरवीगार झाडे, दूरवर दिसणारी शेती आणि मंदिराकडे जाणारा वळणावळणाचा रस्ता हे सर्व मिळून एक विलोभनीय दृश्य साकारत आहे. या परिसरातून दिसणारे विहंगम दृश्य मन मोहून टाकणारे आहे.लोणजाई माता मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून, ते एक शांत आणि निसर्गरम्य पर्यटन स्थळ म्हणून ही विकसित होत आहे. शहरी गजबजाटातून दूर, शांतता आणि निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी अनेक जण या ठिकाणी येत आहेत. विशेषतः सुट्ट्यांच्या दिवसांमध्ये किंवा आठवड्याच्या शेवटी इथे भाविक आणि पर्यटक यांची गर्दी वाढते. स्थानिक प्रशासनाने या परिसराच्या विकासासाठी आणि स्वच्छतेसाठी प्रयत्न केल्यास हे स्थळ अधिक आकर्षक बनेल आणि परिसरातील पर्यटनाला चालना मिळेल. अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लोणजाई माता मंदिराचा हा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला असल्याने भविष्यात तो नाशिक जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ठिकाण म्हणून उदयास येऊ शकतो.

## महापालिकेच्यावतीने पर्यावरण दिनानिमित्त भव्य सायकल रॅलीचे आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.०१, पनवेल :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिका आणि विविध सायकलिंग संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक प्रदूषणाच्या निर्मूलनाचे महत्त्व या विषयावर जनजागृती करण्यासाठी आज दिनांक १ जून रोजी सकाळी सायक्लोथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले. उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सुचनेनुसार घेण्यात आलेल्या या रॅलीला महापालिका सहायक आयुक्त श्रीराम पवार यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. भारत पेट्रोल पंप (ओरियन मॉल जवळ) येथून सुरू होऊन एचडीएफसी सर्कल – आयडीएफसी सर्कल मार्गे पुन्हा वडाळे तलाव येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला.

नामवंत सायकलिंग क्लब्स आणि पर्यावरण प्रेमींनी या सायकल रॅलीमध्ये सहभाग नोंदविला. यामध्ये पनवेल बायसिकल ग्रुपचे मेयर सुधीर चाकोळे, पूरनसिंग मेहरा आणि जानेट लॉरेन्स बर्नार्ड (रनथॉन सायक्लिंग क्लब) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. सुमारे १०० पर्यावरणप्रेमी सायकलस्वारांनी यात सहभाग नोंदविला. यावर्षी युएनईपी (युनायटेड नेशन्स एन्व्हायरमेंट प्रोग्रॅम) यांनी जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन (एंडिंग प्लास्टिक पॉल्युशन ग्लोबली) ही थीम घोषित केलेली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २२ मे ते ०५ जून २०२५ या कालावधीत देशभर जनजागृतीसाठी विशेष मोहिम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. यास अनुसरून महापालिकेच्यावतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत आयोजित केलेल्या या सायकल रॅलीमध्ये प्लास्टिक प्रदूषणाचे तोटे, प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठीच्या उपाय योजना बाबत संदेश देण्यात आला. रनथॉन सायक्लिंग क्लब, फिट इंडिया संडे सायक्लिंग, बीवायसीएस, पनवेल सायक्लिंग क्लब, डेकाथलॉन सायक्लिंग क्लब, टीम केकेसीसी, पनवेल रायडर्स आदि संघटना या रॅलीत सहभागी झाल्या होत्या.